**फौजदारी प्रक्रिया संहिता {१९७४ चे अधिनियम २} चे प्रकरण २० अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख**

**श्रीगोंदा येथील न्यायदंडाधिकारी वर्ग—१ श्रीमती के. ए. काटकर यांचे न्यायालयात**

| | |
|---|---|
| | **समरी फौजदारी केस नं.११४५/२०२२**<br>**निशाणी कमांक** |
| १) गुन्हा घडल्याची तारीख | दि. ०१/१०/२०२२ |
| २) फिर्याद दाखल केल्याची तारीख | दि. ०१/१०/२०२२ |
| ३) फिर्यादी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील. | प्रताप तानाजी देवकाते, पोकॉ/२५९२,<br>श्रीगोंदा पोलिस ठाणे |
| ४) आरोपी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील. | **ऋषीकेश जबाजी रसाळ**, वय — २० वर्षे,<br>राहणार — चांडगांव,<br>ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर. |

५) दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आरोपीस वाचून स्पष्ट करून सांगण्यात आला तो याप्रमाणे—

दिनांक ०१/१०/२०२२ रोजी १५.२० वाजता श्रीगोंदा शहरात, एस.बी.आय बॅकेसमोर श्रीगोंदा ते काष्टी जाणारे रोडवर तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटारसायकल नंबर एम.एच.१६. सी.आर.०२१० हीचेवर तुम्ही व तुमच्यासह इतर दोन व्यक्ती असे ट्रिपल सिट बसून मोटारसायकल चालविताना मिळून आलात म्हणून तुमचे विरूध्द मो.वा.का.क. १२८/१७७ प्रमाणे गुन्हा केल्याचे दोषारोप आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन.

प्रश्न १:— पोलिसांनी केलेल्या तपासकामातील कागदपत्राच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तरः— होय.

प्रश्न २:—दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हांस वाचून व स्पष्ट करून सांगण्यात आला तो तुम्हांस समजला का ?

उत्तरः— होय.

प्रश्न ३:—सदरचा गुन्हा तुम्हांस कबुल आहे का ?

उत्तरः— होय. मी गुन्हा स्वेच्छेने कबुल करतो.

| | |
|---|---|
| आरोपीची सही<br><br>———————————— | समक्ष<br><br>सही/—<br>**(श्रीमती के. ए. काटकर)** |
| **दिनांक :— १२/११/२०२२** | **न्यायदंडाधिकारी वर्ग १, श्रीगोंदा** |

## <u>न्यायनिर्णय</u>
## (जाहीर दिनांक १२/११/२०२२)

१. आरोपी यांनी स्वखुशीने गुन्हा कबूल करीत असल्याचे सांगितले. सदरचा गुन्हा आरोपीकडून पहिल्यांदा घडल्याचे आरोपीने सांगितले आहे. त्यांच्या या सांगण्यावरून त्यांचेकडे चौकशी केली. त्यावेळी त्याने त्याला कोणीही कसलाही मोह दाखविला नाही अगर त्याचेवर कोणीही गुन्हा कबूल करणेकरिता दबाव आणला नसून स्वखुशीने व त्याच्या मनः निर्धारप्रमाणे गुन्हा कबूल करीत असल्याचे त्याने सांगितले. तसेच आरोपीने तो कुटुंबातील एकमेव कमावता व्यक्ति आहे व त्याचे कुटुंब त्याचेवर अवलंबून आहे, अशा परिस्थितीत आरोपीने कमीतकमी शिक्षा करावी अशी विनंती केली.

२. आरोपी स्वखुशीने गुन्हा कबूल करीत आहे. त्याला कमीत कमी शिक्षा करावी अशी विनंती आरोपीने केली. यावरून हे स्पष्ट होते की, आरोपीने मो.वा.का.क. १२८/१७७ या कलमान्वये गुन्हा केला आहे. आरोपीचे म्हणणे विचारात घेण्यासारखे आहे. तरी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. **ऋषीकेश जबाजी रसाळ**, वय — २० वर्षे, राहणार — चांडगांव, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांना खालील गुन्हयासाठी दोषी धरण्यात येते.

२. आरोपीने मो.वा.का.क. १२८/१७७ खालील गुन्हयासाठी दंड म्हणून रोख रक्कम रू. ३००/—(रूपये तीनशे मात्र) भरावेत. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला २ दिवस साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते.

३. आरोपीला इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास सोडून देण्यात यावे.

४. आरोपीला निकालाची प्रत निःशुल्क देण्यात यावी.
येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात जाहीर.

**सही/—**
**श्रीमती के. ए. काटकर**
न्यायदंडाधिकारी वर्ग—१, श्रीगोंदा.

दिनांक :— १२/११/२०२२

: **C E R T I F I C A T E** :-

I affirm that the contents of this pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | SCC No.1145/2022 |
| Name of Stenographer | : | Smt. S. V. Jadhav |
| Court Name | : | Joint Civil & Criminal Court, Shrigonda |
| Date of Decision | : | 12/11/2022 |
| Order signed by P.O. on | : | 12/11/2022 |
| Order uploaded on | : | 12/11/2022 |